नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३३० | Issue - 330 | वार शुक्रवार दि. १८ एप्रिल २०२५ | Blow- Friday Date 18 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# वक्फ कायद्यातील दोन तरतुदींना सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

## वक्फ बोर्डात गैर-मुस्लिम सदस्याची नियुक्ती होणार नाही'; केंद्र सरकारचं सुप्रीम कोर्टात आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सुप्रीम कोर्टात वक्फ सुधारणा कायद्याविरोधात दाखल याचिकांवर सलग दुसऱ्या दिवशी सुनावणी पार पडली. कोर्टाने वक्फ कायद्याला स्थगिती देण्यास नकार दिला. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकार सात दिवसांत उत्तर देईल, असे सांगितले. कोर्टाने हे रेकॉर्डवर घेतले. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड कोणतीही नवीन नियुक्ती करणार नाही. तसेच, नोंदणीकृत वक्फ मालमत्ता किंवा अधिसूचनेद्वारे घोषित वक्फ मालमत्ता सरकार ऊश-पींळषू करणार नाही. न्यायालयाने केंद्र सरकारला सात दिवसांत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. वक्फ कायद्यातील बदलांवर अधिवक्ता बरुण कुमार सिन्हा यांनी प्रतिक्रिया दिली. सुप्रीम कोर्टाने कायद्याला स्थगिती दिलेली नाही, असं अधिवक्ता बरुण कुमार सिन्हा यांनी सांगितलं.




नव्या वक्फ कायद्यातील दोन कलमांना स्थिगीती देत आहोत. वक्फच्या नोंदणीकृत किंवा नोंदणी नसलेल्या मालमत्तांवर कोणताही निर्णय नको. वक्फची कोणतीही मालमत्ता असो, पुढील सुनावणीपर्यंत जैसे थे स्थिती ठेवा. वक्फ बोर्डावर नव्याने नियुक्त्या नको, वक्फ परिषदेचीही निर्मिती नको, असं कोर्टाने म्हटलं आहे. तर 'मुस्लिमेतर सदस्यांची नियुक्ती करणार नाही. तसेच वक्फ अंतर्गत नोंदणी झालेल्या मालमत्ता डी-नोटीफाय होणार नाही, असं आश्वासन केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात दिलं आहे.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी कोर्टाला सांगितले की, सरकारला उत्तर देण्यासाठी वेळ हवा आहे. त्यामुळे कोर्टाने त्यांना एक आठवड्याची मुदत दिली आहे. या प्रकरणात अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. त्यामुळे कोर्टाने फक्त पाच याचिकांवर सुनावणी करण्याचे ठरवले आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी सांगितले की, जर वक्फ मालमत्तेची नोंदणी १९९५ च्या कायद्यानुसार झाली असेल, तर त्या मालमत्तेला कोणीही स्पर्श करू शकत नाही. केंद्र सरकारने कोर्टाला आश्वासन दिले आहे की, 'वक्फ बाय डीड' आणि 'वक्फ बाय युजर'ला गैर-अधिसूचित केले जाणार नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे. त्यावेळी वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०२५ च्या वैधतेवर युक्तिवाद केला जाईल.

वक्फ कायद्यावर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. त्या खालीलप्रमाणे:

केंद्र सरकारने वक्फ कायद्याच्या विरोधात दाखल याचिकांवर उत्तर देण्यासाठी सात दिवसांचा वेळ मागितला आहे. कोर्टाने सांगितले की, केंद्रीय वक्फ परिषद आणि बोर्डात कोणतीही नवीन नेमणूक करू नये. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी कोर्टाकडे एक आठवड्याचा वेळ मागितला, जो कोर्टाने मान्य केला. कोर्टाने सांगितले की, सगळ्या याचिकांवर सुनावणी करणे शक्य नाही, त्यामुळे फक्त पाच याचिकांवरच सुनावणी होईल. जर वक्फ मालमत्तेची नोंदणी १९९५ च्या (पान २ वर...)

# आपले सरकार पोर्टवरील सेवा देताना दिरंगाई केल्यास विभागप्रमुखांना दरदिवशी १००० रुपये दंड

मुंबई : सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा बसल्या जागी पुरविण्यासाठी आणि सरकारी कार्यालयातील येणाऱ्या अडचणींच्या तक्रारी करण्यासाठी सरकारने आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप ही सेवा सुरू केली आहे. अनेकदा या पोर्टलवरुन सेवा उपलब्ध करताना किंवा तक्रारीचा निपटारा करताना प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून दिरंगाई केली जाते. आता, आपले सरकार पोर्टलवर (श्रिशरीज्ञरी) अधिसूचित सेवा उपलब्ध करण्यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांना दरदिवशी १ हजार रुपयांचा दंड लावण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवपरींळी) यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध आहेत.

प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिसूचित सेवा पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखाला दरदिवशी १ हजार रुपयांचा दंड लावण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना दिल्या आहेत. त्यामुळे, आपलं सरकार पोर्टवरील शासकीय सेवा अधिक गतीमान होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात विविध सामाजिक क्षेत्रांची वॉररुम बैठक आज संपन्न झाली. त्यामध्ये, सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या आपलं सरकार पोर्टलच्या तक्रारी आणि त्यावर होत असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने देखील चर्चा झाली.

या बैठकीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, ॲग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मे २०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी सचिवांना दिल्या. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात. त्याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन सेवा उपलब्ध करण्यास दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांवर दरदिवशी १ हजार रुपयांचा दंड लावण्याची कारवाई करण्यात यावी, असे निर्देशच मुख्यमंत्र्यांनी सचिवांना दिले आहेत. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या या निर्देशामुळे आता प्रशासन अधिक गतीमान होऊन (पान २ वर...)

# महाराष्ट्राचे सुपूत्र न्यायमूर्ती बीआर गवई भारताचे ५२ वे सरन्यायाधीश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून महाराष्ट्राचे सुपूत्र न्यायमूर्ती बीआर गवई यांच्या नावाची अधिकृतपणे शिफारस केली आहे. त्यांचे नाव केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे. यासह, न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे ५२ वे सरन्यायाधीश होणार आहेत. पारंपरिकपणे, विद्यमान सरन्यायाधीश (खपवळरप गींवळलळरीू)त्यांच्या उत्तराधिकारीच्या नावाची शिफारस तेव्हाच करतात जेव्हा त्यांना कायदा मंत्रालयाने तसे करण्याची विनंती केलेली असते. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपत आहे. सरन्यायाधीश खन्ना यांच्यानंतर ज्येष्ठता यादीत न्यायमूर्ती गवई यांचे नाव आहे. म्हणूनच न्यायमूर्ती खन्ना यांनी त्यांचे नाव पुढे केले आहे. तथापि, त्यांचा कार्यकाळ फक्त सात महिन्यांचा असेल. सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवरील त्यांच्या प्रोफाइलनुसार, न्यायमूर्ती गवई यांना २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून बढती देण्यात आली. त्यांची निवृत्ती तारीख २३ नोव्हेंबर २०२५ आहे. न्यायमूर्ती गवई यांनी १९८५ मध्ये त्यांच्या वकिली कारकिर्दीला सुरुवात केली.

न्यायमूर्ती गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्रातील (चरहरीरीहींर) अमरावती येथे झाला. त्यांनी १९८५ मध्ये त्यांच्या वकिली कारकिर्दीला सुरुवात केली. १९८७ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्र वकिली सुरू केली. यापूर्वी त्यांनी माजी ॲडव्होकेट जनरल आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश दिवंगत राजा एस. भोसले यांच्यासोबत काम केले. १९८७ ते १९९० पर्यंत मुंबई उच्च न्यायालयात प्रॅक्टिस केली. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून नियुक्ती. १४ नोव्हेंबर २००३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून पदोन्नती मिळाली. १२ नोव्हेंबर २००५ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी न्यायमूर्ती झाले. न्यायमूर्ती गवई हे दुसरे दलित सरन्यायाधीश असतील, त्यांनी नोटाबंदीचे समर्थन केले होते. (पान २ वर....)


**कलम ३७०, नोटबंदी वैध खटल्यांमध्ये सहभाग, इलेक्टोरल बाँड अवैध ठरवणाऱ्या खंडपीठात सहभाग**

# महेश मांजरेकरांना व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या चित्रपट पुरस्कारांची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी १७ एप्रिल रोजी केली. यामध्ये चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार, स्व. राज कपूर जीवन गौरव पुरस्कार, स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार अशा पाच महत्त्वाच्या पुरस्कारांची घोषणा शेलार यांनी मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेतून केली.

या वर्षीचा चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते महेश मांजरेकर जाहीर झाला आहे. या पुरस्काराअंतर्गत १० लाख रुपये रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि चांदीचे पदक प्रदान केले जाईल. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वेला प्रदान करण्यात येणार असून, ६ लाख रुपये स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि चांदीचे पदक असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. स्व. राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना देण्यात येणार असून स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार यंदा अष्टपैलू अभिनेत्री काजोल देवगण यांना प्रदाने केला जाईल. या दोन्ही पुरस्कारांअंतर्गत अनुक्रमे १० लाख रुपये आणि ६ लाख रुपयांची रोख रक्कम दिली जाईल.



१९९३ पासून देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. १० लाख रुपये रोख रक्कम, मानचिन्ह, मानपत्र आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरुप असेल. सर्व पुरस्कारांचे वितरण २५ एप्रिल २०२५ रोजी एन. एस. सी. आय. डोम, मुंबई येथे एका भव्य समारंभात होणार आहे. या सोहळ्याशिवाय, संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे एक खास सांगीतिक मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात सुरेश वाडकर, आदर्श शिंदे, वैशाली सामंत, उर्मिला धनगर, नंदेश उमक आदी कलाकार सहभागी होणार असून, संचालन सुबोध भावे करणार आहेत. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीतं, नाट्यप्रवेश व नृत्य सादर केले जातील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सन्मानिका प्रवेशपत्रे शिवाजी नाट्य मंदिर व रवींद्र नाट्य मंदिर येथे 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर वितरित केली जातील, अशी माहिती शेलार यांनी या पत्रकार परिषदेतून दिली.

**केंद्र सरकारला दिला मोठा इशारा**

**राज ठाकरे यांचं शाळेतील हिंदी भाषेवर वक्तव्य**

# शाळांमध्ये हिंदीची सक्ती; हिंदी लादणार असाल तर मात्र संघर्ष अटळ : राज ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शालेय शिक्षणात इयत्ता पहिली पासून हिंदी सक्तीच्या निर्णयावरुन केंद्र सरकारलाला मोठा इशारा दिला आहे. राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही. केंद्र सरकारचं सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाहीत. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली, आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे प्रकार का सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली आहे.

प्रत्येक भाषा ही सुंदरच असते आणि तिच्या जडण्याघडण्याच्या मागे एक दीर्घ इतिहास असतो, परंपरा असते. आणि ती ज्या राज्याची भाषा असते, त्या राज्यात तिचा सन्मान राखलाच गेला पाहिजे. महाराष्ट्रात जसा मराठीचा सन्मान इतर भाषिकांकडून राखला गेला पाहिजे, तसा सन्मान इतर राज्यात त्या भाषेचा सर्व भाषिकांकडून राखला गेला पाहिजे. अगदी इतर राज्यात राहणाऱ्या मराठी जनांनी त्या राज्याची भाषा आपली मानली पाहिजे हा आमचा आग्रहच आहे. पण हे सोडून या देशाची भाषिक परंपराच खिळखिळी करणार असाल तर ते आम्हाला मान्य नाही, अशी रोखठोक भूमिका राज ठाकरे यांनी मांडली आहे.



आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही आहोत! महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा द्यायचा प्रयत्न कराल तर महाराष्ट्रात संघर्ष अटळ आहे. या सगळ्याकडे पाहिलं तर लक्षात येतं की सरकार हा संघर्ष मुद्दामून घडवत आहे. येणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा काढून घेण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरु आहे? या राज्यातील मराठीतर भाषिकांनी पण सरकारचा हा डाव समजून घ्यावा. त्यांना तुमच्या भाषेबद्दल विशेष प्रेम आहे असं काही नाही. त्यांना तुमची माथी भडकवून स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली आहे.

आज राज्याची आर्थिक अवस्था बिकट आहे, सरकारकडे योजनांसाठी पैसाच शिल्लक नाही. मराठी तरुण-तरुणी नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. कर्जमाफी करू असं निवडणुकीच्या आधी सांगितलं, पण पुढे ती केलीच नाही. त्यामुळे कर्जमाफीच्या आशेवर असलेला शेतकरी निराश आहे. आणि उद्योग जगताने महाराष्ट्राकडे पाठ फिरवल्यासारखी परिस्थिती आहे. जेव्हा सांगण्यासारखं किंवा ठोस दाखवण्यासारखं काहीच नसतं, तेव्हा फोडा आणि राज्य करा हा ब्रिटिशांचा मंत्र इथे वापरला जातोय, अशी शंका यावी अशीच पाऊलं सरकारकडून उचलली जात आहेत, असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

बरं हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्रातच का? ही अशी हिंदीची सक्ती दक्षिणेच्या राज्यात कराल का? आणि करून तर बघा, तिथली सरकारंच पेटून उठतील. इथलं राज्यातील सरकार आणि त्यातील घटक पक्ष निमूटपणे हे सगळं खपवून घेतात म्हणून इथे ही सक्ती केली जात आहे. बाकीच्यांचं आम्हाला माहीत नाही आणि आम्हाला देणंघेणं पण नाही, पण महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे खपवून घेणार नाही, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे.

महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकण्याची सक्ती इथे खपवून घेतली जाणार नाही. शालेय अभ्यासक्रमातील हिंदीची पुस्तकं दुकानांमध्ये विकू दिली जाणार नाहीत आणि शाळांना देखील ती पुस्तकं विद्यार्थ्यांना वाटू दिली जाणार नाहीत, याची नोंद शाळा प्रशासनाने घ्यावी, असं आवाहन राज ठाकरे यांनी केलं आहे.

प्रत्येक राज्यात फक्त त्यांच्या राजभाषेचाच मान राखला गेला पाहीजे! उद्या सर्व राज्यांमध्ये मराठी भाषा पहिली पासून शिकवाल का? नाही ना? मग ही जबरदस्ती इथेच का? हा मुद्दा ताणू नये असं माझं सरकारला आवाहन आहे. पण या आवाहनाला आव्हान देणार असाल आणि हिंदी लादणार असाल तर मात्र संघर्ष अटळ आहे आणि ज्याला फक्त सरकारच जबाबदार राहील. त्यामुळे सरकारने लोकभावनेचा आदर करत हा निर्णय मागे तात्काळ घेण्याचे आदेश द्यावेत, असंही आवाहन राज ठाकरे यांनी केलं आहे.

माझ्या महाराष्ट्रातील तमाम मराठी मातांना, भगिनींना आणि बांधवांना तसेच माझ्या मराठी वर्तमानपत्रात आणि मराठी वृत्तवाहिन्यांमध्ये काम करणाऱ्या सर्व बांधवांना आणि भगिनींना देखील विनंती आहे की, यात कोणताही वादविवाद न करता याचा निषेध आणि विरोध करावा! आणि हो महाराष्ट्रातील इतर राजकीय पक्षांना जर थोडं जरी मराठी भाषेबद्दल प्रेम असेल तर ते देखील याला विरोध करतील. आज भाषा सक्ती करत आहेत, उद्या इतर सक्तीचे फतवे काढतील. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो, अशी टीका राज ठाकरे यांनी केली आहे.

## संपादकीय....

### न्यायालयाची स्थगिती

सुप्रीम कोर्टात वक्फ सुधारणा कायद्याविरोधात दाखल याचिकांवर सलग दुसऱ्या दिवशी सुनावणी पार पडली. कोर्टाने वक्फ कायद्याला स्थगिती देण्यास नकार दिला. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकार सात दिवसांत उत्तर देईल, असे सांगितले. कोर्टाने हे रेकॉर्डवर घेतले. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड कोणतीही नवीन नियुक्ती करणार नाही. तसेच, नोंदणीकृत वक्फ मालमत्ता किंवा अधिसूचनेद्वारे घोषित वक्फ मालमत्ता सरकार ऊश-पींळषू करणार नाही. न्यायालयाने केंद्र सरकारला सात दिवसांत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. वक्फ कायद्यातील बदलांवर अधिवक्ता बरुण कुमार सिन्हा यांनी प्रतिक्रिया दिली. सुप्रीम कोर्टाने कायद्याला स्थगिती दिलेली नाही, असं अधिवक्ता बरुण कुमार सिन्हा यांनी सांगितलं. नव्या वक्फ कायद्यातील दोन कलमांना स्थिगीती देत आहोत. वक्फच्या नोंदणीकृत किंवा नोंदणी नसलेल्या मालमत्तांवर कोणताही निर्णय नको.

# श्री कल्लेश्वर यात्रेनिमित्त प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांची कार्यशाळा गोगाव येथे संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : श्री कल्लेश्वर यात्रेनिमित्त प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांची कार्यशाळा गोगाव येथे संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेजर मल्लिनाथ मुळजे हे होते तर गोगावच्या सरपंच वनिताताई सुरवसे यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. कार्यक्रमाला माजी सरपंच प्रदीप जगताप ,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, निवृत्ती पाटील, कल्लप्पा पाटील ,काशिनाथ आलोरे, गंगाधर जिरगे, शरणाप्पा जिरगे, बाबू बिराजदार आदी उपस्थित होते. यावेळी विविध विषयावर माहिती फलक लावण्यात आले होते त्याची माहिती समजावून सांगण्यात आले यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभाग घेऊन कार्यक्रमाची माहिती घेत होते कार्यक्रम आभार श्याम कुमार पाटील यांनी मानले.






## तथागत तरुण उत्क्रीडा सांस्कृतिक मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४४ व्या जयंतीनिमित्त पंढरपुरात तथागत तरुण उत्क्रीडा सांस्कृतिक मंडळ वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पृथ्वीवर्षीप्रमाणे याव- र्षीही मंडळाच्या वतीने मिष्ठ अन्न भोजनाचा कार्यक्रम ही ठेवला होता यावेळी मंडळाचे कार्यकर्ते व देतील व्यापाऱ्यांनी हा भोजनाचा स्वाद घेतला.

यावेळी उपस्थित अवि वाघमारे, रुपेश वाघमारे, महादेव वाघमारे, राजू काळुंखे, सिद्धनाथ भंडारे, कुमार वाघमारे, कोंडीबा वाघमारे, दिनेश सगरे, कृष्णा कवडे, बाळासाहेब सगळे, पिंटू शेख, अजय पाळसांडे, अंकुश शेळके, इत्यादी मंडळाचे कार्यकर्ते ही उपस्थित होते.



## आंबेडकर जयंती निमित्त मनसेचा 'एक वही एक पेन' उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून मनसेच्या वतीने विद्यार्थ्यांना मिरवणुकी दरम्यान 'एक वही , एक पेन' असा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

मनसे शाखा कोंबडपाडा परिसरात शहर उपाध्यक्ष कुमार व्यंकटेश पुजारी व मनसे विभाग अध्यक्ष कुणाल आहिरे, जनहित शहर उपाध्यक्ष ॲड.सिद्धार्थ खाणे, शिनू पुजारी, राजू पुजारी यांच्या नेतृत्वाखाली हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात शेकडो गरीब गरजू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



## आपले सरकार पोर्टवरील सेवा देताना दिरंगाई केल्यास विभागप्रमुखांना दरदिवशी १००० रुपये दंड

(पान १ वरून...) नागरिकांच्या स्थानिक विभागासंदर्भातील तक्रारींचा लवकरात लवकर निपटारा होण्यास मदत मिळणार आहे.

'आपले सरकार' हा महाराष्ट्र, सरकारचा एक उपक्रम आहे, ज्याचा उद्देश नागरिकांना अधिक कार्यक्षमतेने आणि पारदर्शकपणे विविध सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देणे आहे. आपले सरकार पोर्टलद्वारे, नागरिक प्रमाणपत्रे, परवाने, आणि इतर विविध प्रकारच्या सेवांसाठी अर्ज करू शकतात. त्यात तक्रार निवारण यंत्रणा देखील समाविष्ट आहे, जिथे लोक सरकारी कार्यालयासंदर्भात तक्रारी किंवा त्यांना सरकारी सेवांबाबत भेडसावणाऱ्या समस्या नोंदवू शकतात. प्रशासनाला नागरिकांच्या जवळ आणण्यासाठी आणि सरकारी कार्यालयांना प्रत्यक्ष भेटी देण्याची गरज कमी करण्यासाठी या पोर्टलला बनवण्यात आले आहे. मोबाईल ॲप आणि पोर्टलद्वारे ही सेवा कार्यरत आहे.

## महाराष्ट्राचे सुपूत्र न्यायमूर्ती बीआर गवई भारताचे ५२ वे सरन्यायाधीश

(पान १ वरून..) न्यायमूर्ती गवई हे देशातील दुसरे दलित सरन्यायाधीश असतील. त्यांच्या आधी न्यायमूर्ती केजी बालकृष्णन हे भारताचे सरन्यायाधीश झाले होते. २००७ मध्ये न्यायमूर्ती बालकृष्णन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले होते. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून, न्यायमूर्ती गवई यांनी अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये सहभाग घेतला आहे. त्यामध्ये मोदी सरकारच्या २०१६ च्या नोटाबंदीच्या निर्णयाचे समर्थन करणे आणि निवडणूक रोखे योजना असंवैधानिक घोषित करणे समाविष्ट आहे. ज्येष्ठता यादीत न्यायमूर्ती गवई यांच्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा क्रमांक लागतो. त्यांना ५३ वे सरन्यायाधीश होण्याची शक्यता आहे.

१९ ऑक्टोबर रोजी गुजरातमधील अहमदाबाद येथे झालेल्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या वार्षिक परिषदेत न्यायमूर्ती गवई उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की, पदावर असताना आणि शिष्टाचाराच्या मर्यादेबाहेर न्यायाधीशाने राजकारणी किंवा नोकरशहाची प्रशंसा केल्याने संपूर्ण न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास कमी होऊ शकतो. निवडणूक लढवण्यासाठी न्यायमूर्तींनी राजीनामा दिल्याने लोकांच्या निष्पक्षतेच्या धारणेवर परिणाम होऊ शकतो. न्यायालयीन नीतिमत्ता आणि सचोटी हे कायदेशीर व्यवस्थेची विश्वासार्हता टिकवून ठेवणारे मूलभूत आधारस्तंभ आहेत. न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवणे महत्त्वाचे आहे. जर विश्वास उडाला तर ते न्यायव्यवस्थेबाहेर न्याय शोधतील. न्याय मिळविण्यासाठी लोक भ्रष्टाचार, जमावाकडून न्याय इत्यादी पद्धतींचा अवलंब करू शकतात. यामुळे समाजातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडू शकते.

## वक्फ कायद्यातील दोन तरतुदींना सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

(पान १ वरून...)

कायद्यानुसार झाली असेल, तर त्या मालमत्तेला कोणीही स्पर्श करू शकत नाही, असे कोर्टाने स्पष्ट केले. केंद्र सरकारने कोर्टाला सांगितले की, ते 'वक्फ बाय डीड' आणि 'वक्फ बाय युजर'ला गैर-अधिसूचित करणार नाहीत. वक्फ कायद्यातील बदलांवर वकील बरुण कुमार सिन्हा म्हणाले, सुप्रीम कोर्टाने वक्फ कायद्याला स्थगिती दिलेली नाही. सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले आहे की, नवीन सुधारणा कायद्यानुसार परिषद किंवा बोर्डात कोणतीही नेमणूक केली जाणार नाही. ज्या मालमत्ता नोंदणीकृत आहेत, त्यांना सरकार ऊश-पींळषू करणार नाही. मात्र, इतर मालमत्तांवर सरकार कारवाई करू शकते.

असदुद्दीन ओवैसी यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, आम्ही या कायद्याला असंवैधानिक मानतो. ते पुढे म्हणाले, सुप्रीम कोर्टाने सेंट्रल वक्फ कौन्सिल आणि स्टेट वक्फ कौन्सिलची स्थापना करण्यास मनाई केली आहे. 'वक्फ बाय युजर'ला काढता येणार नाही. गझङ मध्ये चर्चे दरम्यान मी सरकारकडून प्रस्तावित असलेल्या सगळ्या सुधारणांना विरोध केला होता. या कायद्याविरोधात आमची कायदेशीर लढाई सुरू राहील. याचा अर्थ, ओवैसी या कायद्याला विरोध करत आहेत आणि ते याविरोधात कोर्टात लढाई लढणार आहेत.

काँग्रेस नेते इम्रान प्रतापगढी यांनी सुप्रीम कोर्टाचे आभार मानले आहेत. ते म्हणाले, अंतरिम दिलासा दिल्याबद्दल मी सुप्रीम कोर्टाचा आभारी आहे. कोर्टाने ते मुद्दे उपस्थित केले, जे आम्ही संसदेत मांडले होते. आजच्या निर्णयावरून हे स्पष्ट होते की, हा कायदा संविधानाच्या विरोधात आहे. हा संविधानचा विजय आहे, कोणा एका पक्षाचा नाही. येणाऱ्या दिवसात कोर्ट आणखी दिलासा देईल आणि सरकारची जमीन हडपण्याची योजना हाणून पाडेल.

अअझ नेते अमानतुल्लाह खान म्हणाले, मी सुप्रीम कोर्ट, न्यायाधीश आणि वकिलांचे आभार मानतो, ज्यांनी धर्मपेक्षा देशाचे रक्षण करण्यासाठी मदत केली. आम्ही निर्णयाने समाधानी आहोत. केंद्र सरकारने कोर्टात सांगितले की, वक्फ-बाय-युजर अंतर्गत मालमत्ता वक्फकडेच राहतील. केंद्र सरकार सात दिवसात उत्तर देईल. ऊच् कोर्टापेक्षा मोठा कसा असू शकतो, हा नियम नक्कीच काढला जाईल. वक्फ बोर्ड जैसे थे राहील.



## पोलीस उपनिरीक्षक नागेश खैरमोडे यांचा प्रशंसनीय कामगिरीबद्दल सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : कागल जिल्हा कोल्हापूर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष अधिकारी मा. नागेश खैरमोडे यांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांना पोलीस अधीक्षक कोल्हापूर मा.महेंद्र पंडित यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आले.

यापुढे भविष्यात सुद्धा अशीच उल्लेखनीय कामगिरी करत राहावी अशा अशी आशा करण्यात आली.

या अगोदर सुद्धा यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले होते.

**जिल्हा सामान्य रुग्णालयांतील प्रतिनियुक्त्यांमध्ये घोळ?**

**उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांनी दिले निर्देश**

# प्रतिनियुक्त्या रद्द करून अहवाल सादर करण्याचे आरोग्य उपसंचालकांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : बुलढाणा : अकोला आरोग्य सेवा उपसंचालक मंडळाच्या अधिनस्त असलेल्या पाचही जिल्हा सामान्य रुग्णालयांमध्ये प्रतिनियुक्त्यांमध्ये कथितस्तरावर आर्थिक गैरव्यवहार होऊन प्रशासकीय अनियमितता झाल्याप्रकरणी चौकशी करून अनुषंगिक अहवाल अकोला आरोग्य सेवा मंडळाच्या उपसंचालकांना सादर करण्यात यावा, असे निर्देश उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांनी दिले आहेत. त्यामुळे अकोला, बुलढाणा, अमरावती, वाशिम आणि यवतमाळ जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वर्तुळात खळबळ पाचही जिल्हा शल्य चिकित्सकांना पत्राद्वारे माहिती ११ एप्रिल रोजी आरोग्य उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांनी पाचही जिल्हा सामान्य रुग्णालयांच्या जिल्हा शल्यचिकित्सकांना एका पत्राद्वारे अनुषंगिक बाब अवगत केली आहे.



सोबतच जिल्हा सामान्य रुग्णालयांतर्गत झालेल्या या प्रतिनियुक्त्यांत जिल्हा शल्यचिकित्सकांनी तात्काळ रद्द करून तक्रारीच्या संदर्भाने चौकशी करत अहवाल सादर करण्याचे स्पष्ट केले आहे.यामध्ये विभागीय आयुक्त अमरावती कार्यालयास देण्यात आलेल्या सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांच्या तक्रारीचाही संदर्भ देण्यात आला असल्याचे सूत्रांनी सांगितले. या गंभीर प्रकरणी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने देऊळगाव राजा येथील चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी या प्रकरणात शासन तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे सक्षम प्राधिकारी तसेच विभागीय आयुक्त अमरावती कार्यालयामध्ये तक्रार दाखल केली होती. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त श्र्वेता सिघल यांनी आरोग्य सेवा अकोला मंडळाचे उपसंचालक यांना एक पत्रही दिले होते. त्यानुषंगाने उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांनी हे निर्देश दिले आहेत. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी दिलेल्या तक्रारीमध्ये अकोला, बुलढाणा, अमरावती, वाशिम आणि यवतमाळ जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये प्रतिनियुक्ती प्रक्रियेत अटी व शर्तीचे पालन करण्यात आले नाही. सोबतच नियुक्तीच्या कार्यपद्धतीत कथितस्तरावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे म्हटले होते. त्यामुळे संबंधितांच्या मूळ कामावर विपरीत परिणाम होत असल्याचे म्हटले होते.



## कु. माही हिचा ५ वा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : कुमारी माही हिचा ५ वा वाढदिवस गडदे फार्म हाऊस गार्डन शिवशक्तीनगर डायमंड हॉटेल जवळ कुपवाड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी अनेक मान्यवरांनी तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा व भेटवस्तू देण्यात आल्या.

संपूर्ण पोलीस यांच्या मार्फत माहीला भेट वस्तू देण्यात आली. तसेच पत्रकार नामदेव निर्मळे यांचा सुद्धा वाढदिवस कुमारी माही हिच्यासोबत साजरा करण्यात आला.

मामा, भाची यांचा वाढदिवस एकाच दिवशी असल्यामुळे मोठ्या जल्लोषात साजरा झाला. अनेक पाहुणे, मित्रमंडळी, पोलीस खाते, या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आलेल्या पाहुण्यांचे स्वागत सौ कविता निर्मळे यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### घरातून रक्कमसह चांदीचे कॉइन लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील



किचन मधील कपाट उचकटून ६,५०० रुपये रोख रक्कम व पाच ग्रॅम वजनाचे तीन चांदीचे कॉइन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १३ ते १४ एप्रिल दरम्यान येलगुलवार शाळेजवळील सिव्हिल लाईन येथील शास्त्री हौसिंग सोसायटी येथे घडली.याप्रकरणी निनाद बाळकृष्ण बुलबुले (वय-३१,रा.शास्त्रीय हौसिंग सोसायटी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पापडे हे करीत आहेत.

### पत्नीला मारहाण करून माहेरी हाकलले; पतीसह तिघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पत्नीस शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण करून माहेरी हाकलून देऊन पतीने पत्नीस तुझ्या आई-वडिलांकडून दुचाकी आणण्यासाठी पन्नास हजार रुपये घेऊन ये असे म्हणून मानसिक व शारीरिक त्रास दिला असल्याची फिर्याद रुक्मिणी सिद्राम म्हेत्रे (वय-२८,रा.मधुकर उपलप वस्ती) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती सिद्राम, सासू लक्ष्मीबाई व पतीची आत्या शामाबाई (सर्व राहणार सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना मे २०१८ ते ११ मार्च २०२५ रोजी दरम्यान घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल माडे हे करीत आहेत.

### महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावले

सोलापूर, (प्रतिनिधी) : महिलेच्या गळ्यातील ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण हिसका मारून घेऊन निघून गेल्याची घटना १५ एप्रिल रोजी रात्री पावणे आठ वाजण्याच्या दरम्यान दीप हॉस्पिटल समोर घडली. या प्रकरणी रेखा सिद्धेश्वर बिजली (वय-३३,रा.मंत्री चंडक नगर, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दोन अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक महाडिक हे करीत आहेत.

# अवैधरित्या गुटखा वाहतूक करणाऱ्या वाहनावर २५ लाख २३ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल केला हस्तगत

## परीविक्षाधीन आय. पी. एस. अंजना कृष्णा व्हीएस यांनी केली कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : परीविक्षाधिन आय. पी. एस. अंजना कृष्णा अवैधरित्य गुटखा वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करून एकूण २५, २३, ७६०/ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला

याबाबत सविस्तर वृत्त असे की. दि.१२/४/२०२५ रोजी आयपीएस अंजना कृष्णा प्रभारी अधिकारी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे यांना बेकायदेशीरपणे अवैध गुटखा वाहतूक करणारे वाहनाची



माहिती मिळाल्याने त्याप्रमाणे ग्रामीण पोलीस ठाणे येथे पथक तयार करून सदर गाडीचा पिराजी कुरोली तालुका पंढरपूर येथून पाठलाग करून टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीतील परिते गावाजवळ हॉटेल शेळके वाडा येथे सदर वाहन पकडले. सदरचालकास वाहनाची व वानातील मालाबाबत चौकशी केली असता सदर वाहनात सुगंधी गुटखा सुपारी व सुगंधी तंबाखू असल्याबाबत सांगितले सदर वाहन चालक नामे संतोष मोहन नखाते राहणार वासू दाखवला तालुका सांगोला जिल्हा सोलापूर त्यांच्यासोबत असलेला इसम नामे अनिल सुखदेव बहिरे राहणार बहिरे चिंचोली तालुका सांगोला जिल्हा सोलापूर यांच्याविरुद्ध कारवाई करून एक बोलोरो पिकप त्याची आरटीओ नंबर एम एच ४५ ए एफ २३ झिरो सात व त्यातील सुगंधी गुटखा सुपारी तंबाखू असा एकूण २५ २३ ७६०/रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात व संबंधित इसम टेंभुर्णी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी सो. अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर, सो. मा उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री अर्जुन भोसले सो. मा सह पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा मॅडम, व प्रभारी अधिकारी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे वसई वीरसेन पाटील पोलीस हेड कॉन्स्टेबल राहुल शिंदे पोलीस कॉन्स्टेबल अजित मिसाळ सुनील लोंढे यांनी केली आहे.

# निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी शारदा कापसे बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नफाड नगरपंचायतीच्या सर्व नगरसेवकांची अत्यंत महत्त्वाची बैठक पिठासिन अधिकारी तथा तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली यावेळी नगराध्यक्ष पदासाठी सौ शारदा नंदकुमार कापसे यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र विहित मुदतीत प्राप्त झाल्याने ते छाननीत योग्य व पात्र असल्याने नगराध्यक्ष म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा पिठासिन अधिकारी विशाल नाईकवाडे यांनी केली.

निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा कविता नितीन धरराव यांनी दिनांक २४ मार्च रोजी नगराध्यक्षपदाचा स्वखुशीने जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे राजीनामा दिला होता तो मंजूर झाल्याने नगरपंचायतीच्या नवीन नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया राबविणे आवश्यक होते त्यानुसार निफाड नगरपंचायत अध्यक्ष पदाची निवड करणे करिता विशेष सभा निफाड नगरपंचायत सभागृहात मंगळवार दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली होती ,सदर सभेकरिता सर्व नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते. सभेचे अध्यक्ष तथा पिठासीन अधिकारी विशाल नाईकवाडे तहसीलदार निफाड यांनी निवडणुकीचे कामकाज पार पाडले, निफाड नगरपंचायत



नगराध्यक्ष पदाकरिता शारदा कापसे व रूपाली रंधवे यांचे उमेदवारी अर्ज विहित वेळेत व मुदतीत प्राप्त झालेले होते रूपाली रंधवे यांनी दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी माघारीच्या मुदतीत माघार घेतल्यामुळे अध्यक्षपदाच्या निवडणुकीकरिता एकच अर्ज प्राप्त असल्यामुळे शारदा कापसे यांची नगरपंचायत अध्यक्ष पदाकरिता बिनविरोध निवड झाल्याचे पिठासिन अधिकारी यांनी सभेत जाहीर केले.

# निफाड शहर उपजीविका कृती आराखडा समितीची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दीनदयाळ जन आजीविका योजना - शहरी अंतर्गत शहर उपजीविका कृती आराखडा समितीची बैठक मुख्याधिकारी अमोल चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली निफाड नगरपंचायत कार्यालयात ठीक दु. ३:०० वा. संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा अग्रणी बँक प्रतिनिधी, सामाजिक संस्था प्रतिनिधी, कामगार संघटना, पथ विक्रेता समिती, एकात्मिक बाल विकास प्रतिनिधी, तालुका शिक्षणाधिकारी प्रतिनिधी, व्यापारी संघटना प्रतिनिधी, ट्रान्सपोर्ट संघटना प्रतिनिधी, पुरवठा विभाग प्रतिनिधी तहसिल कार्यालय, निफाड नगरपंचायत कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

शहर अभियान व्यवस्थापक अनिल जाधव यांनी शहरी भागात वास्तव्यास असलेल्या शहरी गरीब नागरिकांना तसेच बांधकाम कामगार, वाहतूक कामगार घरेलू कामगार, काळजी घेणारे कामगार, गिग कामगार व कचरा वेचक कामगार यांच्यासाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करून देण्यासाठी दीनदयाळ जनआजीविका योजना राबविण्यात येणार असले बाबत माहिती समितीपुढे सादर केली. तसेच कृती आराखड्याचे वाचन केले. त्यास मुख्याधिकारी अमोल चौधरी व सर्व समिती सदस्यांनी शहर उपजीविका कृती आराखड्याला मंजुरी दिली. यावेळी कार्यालय अधीक्षक गुलाबराव नवले, नगर अभियंता मयुरी नवले, कर निरीक्षक शरद बोडके,राहुल धनगर, सुवर्णा जाधव, प्रमोद शिंदे यांचे सह समिती सदस्य उपस्थित होते.

# आता पंढरपूरात ही मिळणार मोफत लाडू प्रसादावरून मंदिर समितीचा खुलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आता पंढरपूरात ही मिळणार मोफत लाडू प्रसाद तसेच पंढरपूरात भाविकांना मोफत प्रसाद या मथळ्या खालील प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने खुलासा करण्यात येतो की, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनरांगेतील भाविकांमधून प्रसादाची मागणी होत आहे. दैनंदिन मंदिर समितीमार्फत देवाला जो काही नैवेद्य दाखवतो (महानैवेद्य वगळून) तो भाविकांमध्ये दैनंदिन वाटप करण्यात येतो. याशिवाय, श्रींच्या चरणावर येणारे पेढे, बर्फी, साखर इत्यादी प्रसाद देखील भाविकांना वाटप करण्यात येत आहे. त्यासाठी सुद्धा आवश्यक असणारी परवानगी घेतल्यानंतर मंदिर समितीने निर्णय घेतला तर प्रसाद दिला जाईल असे माझे स्टेटमेंट असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.




श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून अन्नछत्रात मोफत पोटभर भोजन प्रसाद तसेच अल्प देणगी मुल्य आकारून बुंदी व राजगिरा लाडूप्रसाद उपलब्ध करून देण्यात येतो. याशिवाय, मंदिर समिती मार्फत पुरेसा प्रमाणात भाविकांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे यावेळी श्री श्रोत्री यांनी सांगीतले.

## खुळे चौकात बस थांबा सुरू करावा

# अन्यथा लोकशाही मार्गाने रस्ता रोको आंदोलन करू : अनिताताई खरात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी /अतुल सोनकांबळे

दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी विद्या प्रतिष्ठान वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय इंदापूर येथील माजी विद्यार्थी संघटनेने राज्य परिवहन महामंडळ इंदापूर आगार येथे जाऊन अर्ज देऊन विनंती केली की विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय ते बस स्थानक इंदापूर यामधील अंतर ३ ते ४ किलोमीटर असून महाविद्यालया मधील विद्यार्थ्यांना रोज ३ ते ४ किलोमीटर चालत प्रवास करावा लागत आहे व तसेच खुळे चौक ,महादेव नगर मध्ये साधारण २००० लोकांची लोक वस्ती वास्तव्यास आहे. सदर खुळे चौकातून विद्यार्थी, कामगार,व्यापारी वर्गाची वर्दळ असते. अनेक शाळा कॉलेजाकडे जाणारा मार्ग या चौकातून जातो. एवढे असून सुद्धा इंदापूर ,अकलूज,बारामती मार्गाच्या जाणाऱ्या बसेस सदर चौकातून ये जा करत नसल्यामुळे सर्वांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. बस थांबा नसल्यामुळे रात्री अपरात्री प्रवास करणे अवघड होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जाण्या येण्यास नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी इंदापूर आगार यांना अर्जाद्वारे सर्व बसेस सदर महाविद्यालय समोर व खुळे चौकामध्ये बस थांबा बनवण्यात यावा अशी मागणी केली असून परंतु मागणीस म्हणावा असा प्रतिसाद मिळाला नाही तर लोकशाही मार्गाने रस्ता रोको आंदोलन करू अशी रोखठोक भूमिका संघटनेचे सचिव निरंजन देविदास खराडे सदस्य



ओंकार सतिश गलांडे व शुभम महादेव ननवरे यांनी आगरी व्यवस्थापक राज्य परिवहन महामंडळ इंदापूर येथे जाऊन आगार व्यवस्थापक यांच्याकडे अर्जाद्वारे केली. त्यावेळी उपस्थित अनिताताई खरात (संस्थापक अध्यक्ष तेज पृथ्वी फाउंडेशन ग्रुप ) सामाजिक कार्यकर्ते,बंडू दडस, भागवत घनवट,श्रीमंत बंडगर, दिलीप कुंभार, राष्ट्रीय समाज पक्षाचे संपर्क प्रमुख पश्चिम महाराष्ट्र तानाजी शिंगाडे , राष्ट्रीय समाज पक्ष तालुका अध्यक्ष नवनाथ कोळेकर आधी सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

# येडोळा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन व ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील मौजे येडोळा येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने निळा ध्वजारोहन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना आभिवादन करण्यात आले.



येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी, सिद्धार्थ कला व क्रिडा मंडळ, सिध्दार्थ बुद्ध विहार कमिटी येडोळा यांच्या संयुक्त विद्यामाने येडोळा येथील भिमनगर मध्ये समाज मंदिराच्या प्रागणान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ न्या जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी सरपंच सौ. झीमाबाई रामसिंग जाधव व ग्रामविकास अधिकारी सौ. एस.एस. गोरे मॅडम यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पोलिस पाटील नरेश अरविंद जाधव यांच्या हस्ते निळा ध्वजारोहण करून सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेवून भारतरत्न डॉ.. बाबासाहेब आंबेडकर याना आभिवादन करण्यात आले. यावेळी भूषण पवार(उपसरपंच),दिगंबर पाटील (ग्रा. प. सदस्य), सामाजिक कार्यकर्त्या सौ.लक्ष्मी राजेंद्र जाधव (माजी उपसरपंच), कैलास गवळी ग्रुरुजी, चेतन जाधव,राजेंद्र जाधव(मेजर), शिवाजी जाधव, बाळु जाधव सह सिद्धार्थ क्रीडा व कला युवक मंडळ येडोळा,जयंती उत्सव कमिटी,सिद्धार्थ बुद्ध विहार कमिटी येडोळा चे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, महिला व ग्रामस्त मोठ्या संख्याने उपस्थित होते.

## आयपीएस अंजना कृष्णा व्ही. एस. यांचे प्रतिपादन

## स्वेरीत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबाबत महत्वपूर्ण मार्गदर्शन

# परिश्रमात सातत्य ठेवल्यास ध्येय गाठणे शक्य



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'शाळा, कॉलेजेसचे आमंत्रण मी नेहमी स्वीकारते कारण मला विद्यार्थ्यांसोबत संवाद साधायला आवडते. मी केरळमधील एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आहे. शाळेमध्ये असताना माझा प्रथम क्रमांक कधीच नव्हता आणि मी एक सामान्य विद्यार्थिनी होते. पदवीच्या शिक्षणानंतर मी यूपीएससीची तयारी सुरू केली. परीक्षेमध्ये काही गोष्टी आपल्या नियंत्रणात असतात तर काही गोष्टी आपल्या नियंत्रणात नसतात. ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात आहेत त्याच गोष्टींवर आपण भर दिला पाहिजे. परीक्षा मधील चुकातून शिकण्याने आपण खऱ्या अर्थाने घडत असतो. अपयश हे कधीही शेवटचे नसते. त्यामुळे परिश्रमात सातत्य ठेवल्यास आपले ध्येय गाठता येते. यासाठी सकारात्मक विचाराने अभ्यास करा आणि हे सर्व शिक्षणाने साध्य होते.' असे प्रतिपादन त्रिवेंद्रम (केरळ)च्या आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. यांनी केले.




स्वेरीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. ह्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मार्गदर्शन करत होत्या. प्रारंभी डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी त्यांचे स्वागत केले. आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना 'शिक्षणाचे सध्याचे महत्व आणि प्रशासकिय यंत्रणेतील योगदान' याबाबत बोलत असताना पुढे म्हणाल्या की, 'स्पर्धा परीक्षेत पहिल्या प्रयत्नात यशस्वी होणे हे सहज शक्य नसते. मला देखील यशस्वी होण्यासाठी चार वेळा प्रयत्न करावे लागले. पुन्हा पुन्हा अपयश येत राहिले तर आपल्या मनात न्यूनगंड निर्माण होतो आणि अशा काळात बर्याचदा आपल्या कुटुंबातील लोक आणि नातेवाईक ही आपल्याला साथ देत नाहीत. मुलींना तर त्यांच्या शिक्षण आणि करिअर ऐवजी लग्न करून संसारात स्थिर होण्याबाबत सांगितले जाते. अशा वेळी आपण न डगमगता सतत प्रयत्न करत राहणे गरजेचे असते.' असे सांगून स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना महत्वाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी देखील स्पर्धा परीक्षेबाबत कुतूहलाने अनेक प्रश्न विचारले असता आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. यांनी सर्वांची समाधानकारक उत्तरे दिली. यावेळी डॉ.आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त आलेले प्रमुख पाहुणे टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी, पुणे चे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, किर्लोस्कर कंपनीचे एच.आर. ऋषिकेश कुलकर्णी, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मंडवे, स्वेरी संचलित अभियांत्रिकी व फार्मसीचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व चारही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी भारती सुरेश वडतिले (रा.जुना बोरामणी नाका ,विवार पेठ) यांच्याविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १५ एप्रिल रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास जुना बोरामणी नाका येथे घडली.याप्रकरणी काशीबाई शामराव वडतिले (वय-७५,रा.जुना बोरामणी नाका) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की,फिर्यादी या घरी असताना फिर्यादी यांची सून विद्या वडतिले दुकानासमोर सुप व टोपली तसेच झाडूची विक्री करत थांबली होती. त्यावेळी एक गिऱ्हाईक खरेदी करण्यासाठी फिर्यादी यांच्या मोठ्या सुनेजवळ आले असता, त्यावेळी वरील संशयित आरोपी फिर्यादी यांची लहान सून ही बाहेर आली व विद्या हिला तू माझ्याकडील गिऱ्हाईक तुझ्याकडे का बोलावले असे म्हणून दोघींमधून वादविवाद चालू असताना फिर्यादी या भांडण सोडवण्याकरिता मध्ये गेले असता, त्यांना शिवीगाळ करून लाकडी बांबूच्या तुकड्याने मारून दुखापत करत हाताचे बोट फ्रॅक्चर केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल साळुंखे हे करीत आहेत.

# श्री आनंदा आरोटे व आरोटे परिवार यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

## चितळवेढे येथील वारकऱ्यांचा पंढरपुरात सन्मान सोहळा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

भेटी लागी जीवा माझ्या विठुराया

या भक्ती पूर्ण ओढीने संपवून देशभरातून गठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच चितळवेढे या गावातील वारकऱ्यांचा पंढरपूर येथे आगमन झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.





या सोहळ्यात पश्चिम विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील यांच्या शुभहस्ते विठुरायांच्या मूर्तीचे भेट वस्ती देऊन वारकऱ्यांचा गौरव हे करण्यात आला तसेच पत्रकार नागेशदापुरे शाल. व प्रसाद देऊन यांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे शहराध्यक्ष संतोष मोरे, तालुकाध्यक्ष रवींद्र कोळी, विठुरायाच्या दर्शनासाठी ओढ लागलेली असते भक्तगण विठुराया व रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आतुर असतात दर्शनानंतर त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद हा त्यांच्या जीवनातील एक सार्थ अभिमान असतो महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाला ही सेवा करण्याची संधी मिळणे हीच खरी शिकवण असल्याची त्यांनी नमूद केली.

या कार्यक्रमात आनंद बाबुराव आरोटे, सिताराम संतु आरोटे, मधुकर राहूदु आरोटे, विठ्ठल तुकाराम आरोटे, देवराम बबन आरोटे, आनंद रखमा रोटे, श्री विठ्ठल तुकाराम आरोटे, शिवनाथ विठ्ठल आरोटे, किसान भिका आरोटे, ग.भा इंदुबाई आरोटे, सुमन मधुकर आरोटे, चंद्रकला देवराम आरोटे, सुमन आनंदा आरोटे , या मान्यवर वारकऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

पंढरपूरचे ही संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाचे योगदान सतत प्रेरणा देणारे वारकऱ्यांचा असा सन्मान होत रावा आणि त्यांची सेवा कार्याची दखल समाजाने घ्यावी अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# कळंब तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचा आरक्षण सोडत जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतीच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज दि. १६ एप्रिल रोजी सकाळी ११.०० वाजता पंचायत समिती सभागृहात एसडीएम संजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी तहसीलदार हेमंत ढोकले, नायब तहसीलदार सांगळे, सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीनिवास शिंदे, निवडणूक कर्मचारी पाचभाई आप्पा, गपाट, खलील यांच्यासह तालुक्यातील सरपंच, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सदरील



आरक्षणाचा कार्यक्रम २०११ च्या जनगणनेनुसार संपन्न झाला. यावेळी आरक्षण सोडतीच्या चिठ्ठ्या लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आल्या.

अनुसूचित जातीसाठी –

पिंप्री (शि, डिकसळ, जायफळ, वडगाव (शि), भाटशिरपुरा, सापनाई, सातेफळ, गौर, वाकडी के. तर अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिलेसाठी – शिंगोली, पाथर्डी, देवळाली, कन्हेरवाडी, जवळा खुर्द, आवाड शिरपूरा, कोथळा, मंगरूळ, बाभळगाव

अनुसूचित जमातीसाठी – नागूलगाव

अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी – घारगाव

सर्वसाधारण महिला – रांजणी, पाडोळी, चोराखळी, उपळाई, हावरगाव, दाभा, खोंदला, गंभिरवाडी, बांगरवाडी, कोठाळवाडी, बोरवंटी, लासरा, वाणेवाडी, उमरा/परतापूर, गोविंदपूर, गौरगाव, खामसवाडी, लोहटा पूर्व, मस्साख, तांदुळवाडी, पिंपळगाव को, खेर्डा, अंदोरा, बारातेवाडी

सर्वसाधारण प्रवर्गासाठी –

ईटकुर, ढोराळा, एकुरका, ताडगाव, पिंपळगाव डोळा, आढाळा, सात्रा, भोगजी, रायगाव्हन, बहुला, आथर्डी, बरमाचीवाडी, वाकडी ई., बोरगाव ध., हिंगणगाव, करंजकल्ला, लोहटा पश्चिम, मोहा, नागझरवाडी, शिराढोण, वाघोली, सौंदना आंबा

ओबीसी प्रवर्गासाठी – वाठवडा, येरमाळा, शेलगाव दि, भोसा, आडसूळवाडी, दुधाळवाडी, हासेगाव शि, देवधानोरा, सौंदना ढोकी/एरंडगाव, हासेगाव केज, खडकी, दहिफळ

ओबीसी प्रवर्गातील महिलेसाठी –

नायगाव, मलकापूर/संचितपूर, हाळदगाव, शेलगाव ज, पानगाव, माळकरंजा, शेळका धानोरा, रत्नापूर, भाटसांगवी, वडगाव ज, बोरगाव बु, निपाणी, बोरगाव खुर्द,

# ईटकुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इटकुर : प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे,कळंब तालुक्यातील इटकुर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ,बोधिसत्व,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. या वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन आश्रुबा रणदिवे यांच्या हस्ते करण्यात आले तर ध्वजारोहन यशपाल लोंढे यांच्या हस्ते केले. या वेळी गावातील प्रतिष्ठीत मंडळी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.हा जयंती सोहळा पार पाडण्यासाठी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांनी सर्व जबाबदाऱ्या पार पाडून हा जयंती सोहळा पार पाडल्या बद्दल समस्त इटकुर बांधवा कडून कौतुक करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त २१ /४/२०२५ पासुन २७/४/२०२५ पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक, नृत्य, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला संगीत खुर्ची, सामान्य ज्ञान स्पर्धा, गायन स्पर्धा, व्याख्याने, व ईतर आशा विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असुन ३०/४/२०२५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. असे आव्हान जयंती कमिटीतर्फे करण्यात आलेले आहे.



# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुका मधील सिन्नूर गावात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त विविध उपक्रम घेत जयंती साजरी करण्यात आले.दिनांक १३ एप्रिल रोजी रात्री बुद्ध आणि भीम गीतांचे कार्यक्रम लक्ष्मी भजना संघ सिन्नूर यांच्या भजन कार्यक्रम ठेवण्यात आले होते. रात्री १२ वाजता फटाके व केक कापून आनंद उत्सव साजरा करण्यात आला. सकाळी ८ वाजता प्रतिमा पूजन प्रमुख मान्यवरांचा हस्ते करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, युवा पत्रकार निगप्पा निंबाळ, रिपाई दुधानी मुस्लिम आघाडी अध्यक्ष माहेदिमिया जिडगे, दुधानी शहर अध्यक्ष गोरकनाथ



धोदमणी इत्यादी उपस्तित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी रिपाई सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी होते.तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमा पूजन पत्रकार निगप्पा निंबाळ यांच्या हस्ते करण्यात आले तर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन रिपाई मुस्लिम आघाडी अध्यक्ष माहेदिमिया जिडगे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर समुदयिक बुद्ध वंदना घेण्यात आला.झेंडा कट्याचे पूजन रिपाई दुधानी शहर अध्यक्ष गोरकनाथ दोधामणी यांच्या हस्ते करण्यात आले.ध्वजरोहन माजी ग्रामपंचायत सदस्य सिन्नूर तथा मुस्लिम अध्यक्ष हाजीमलंग मुल्ला यांच्या हस्ते करण्यात आला.मान्यवरांचा हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर सिन्नूर ग्रामपंचायत कार्यलय येते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन सरपंच कल्पना सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपसरपंच प्रकाश कळसगोंडा, ग्रामपंचायत लिपिक शिवपुत्र जेवर्गी, ग्रामपंचायत आपरेटर शिंगे, शिराज पठाण,शिपायी राजू कांबळे, सैपना मुल्ला,, निलवा कांबळे व ग्रामस्थ उपस्थित होते.जिल्हा परिषद प्रथमिक कन्नड शाळा, मराठी शाळा, उर्दु शाळा येते ही महामानाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमास शाळेच्या वतीने सर्व उपस्थित मान्यवरचे सत्कार करण्यात आले.त्यानंतर शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांच्या समयोचित आंबेडकर जीवनावर आधारित भाषण झालेत.रिपाई जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना असे म्हणालेत की डॉ. बाबासाहेब आंबेडकर अथवा इतर महापुरुष यांच्या जयंती मोठया धिमाकात जयंती केली जाते.ते करावेच.परंतु त्या महापुरुष चे विचारसरणी अंगीकृत करून तो जडणगडणीत आणणे तितकेच आपले सर्वांचे कर्तव्य आहेत. पण आज महापुरुष यांना आपापल्या जातीत वाटून घेतलेला आहेत.हे चुकीचा असून आपण शिक्षक लोकांनी विध्यार्थीना योग्य मार्गदर्शन करून महापुरुसांना अभिप्रेत असलेल्या समाज घडवण्याचे काम तुमच्या वर असल्याचे सांगितले.जयभिम तरुण मंडळ सिन्नूर चे प्रमुख मार्गदर्शक जयकुमार सोनकांबळे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना असे म्हणालेत की सर्व महापुरुष यांच्या जयंती निमित्त जयंती साजरी करत असताना अनर्थ खरच टाळून ते समजपयोगी कार्यक्रम घ्यावे.आमचे मार्गदर्शक शिव-बसव-डॉ. बी. आर. आंबेडकर मागासवर्गीय बहुउदेसीय सामाजिक संस्थ अक्कलकोट संस्थापक अध्यक्ष संदीप भाऊ मढीखांबे यांनी दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भव्य दिव्य सामुदाहिक विवाह सोहळा ठेवून अनेकांचे विवाह करून दिले. तसेच अनेक महापुरुष यांच्या जयंती निमित्त अन्न वाटप, गरीबना मदत, वृक्षारोपण शैक्षणिक साहित्य वाटप, विविध कर्तृत्वान महिलांचे सन्मान, इत्यादी समाज उपयोग कार्यक्रम घेतात.त्याचाच एक कार्यकर्ते म्हणून आम्ही पण एक छोटासा उपक्रम ठेवला आहे. भविष्यात ही असे कार्यक्रम ठेऊन जयंती साजरी करू असे म्हंटले. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते तथा जयभिम तरुण मंडळ सिन्नूर चे कार्याध्यक्ष हुचाप्पा कांबळे व जयभिम तरुण मंडळ सिन्नूर यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थीना वही पेन, चॉकलेट, पेढा वाटप करण्यात आले.व शाळेच्या आवरत वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेचे मुख्याध्यपक रमेश घोदे सर, मराठी शाळेचे मुख्यद्यापक भाग्यश्री कोष्टी मॅडम, उर्दू शाळेचे मुख्यधपाक आजाम पटेल सर, शिरशैल खानापुरे सर, मलीन्नाथ भूषणगी सर,भरती म्हेत्रे मॅडम,बसवराज कर सर, विकास बोर्डीकर सर, गणेश ओहोळ सर,वैष्णवी परमशेट्टी मॅडम,भारत राठोड सर, आफ्रिन शेख मॅडम, झिरीन बांगी मॅडम व जयभिम तरुण मंडळ सिन्नूर चे आधारस्तंभ चंद्रकांत कांबळे, अध्यक्ष सुरेश सोनकांबळे, संगप्पा उजनी, धर्मा मांग, खाजपा सोनकांबळे, लक्ष्मीपुत्र कांबळे,हनामंत सोनकांबळे, जयभिम सोनकांबळे, पिंटू मांग, सांगप्प सोनकांबळे, सुनील सोनकांबळे, अनिल सोनकांबळे इत्यादी उपस्तित होते. हा कार्यक्रम यशवी करण्यासाठी जयभिम तरुण मंडळ सिन्नूर चे कार्यकर्ते पदाधिकारी समाजबांधव मोठया संख्याने उपस्थिती होते.

## विविध आजारांवर कशाप्रकारे मात करावयाची याबाबतची प्रात्यक्षिके करून दाखवली

## योगाभ्यासाला उत्स्फूर्त प्रतिसाद

# निरोगी आरोग्यासाठी योग प्राणायाम महत्त्वपूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : इंटरनॅशनल योगा ट्रेनर डॉ.सौ..अलका जाधव पतंजली योग समिती व महिला पतंजली योग समिती इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. १६/०४/२०२५ रोजी पहाटे ५ ते ७ वा. पर्यंत शहा सांस्कृतिक भवन येथे खास महिलांसाठी अवघड अवघड आसनांची प्रात्यक्षिके डॉ अलका जाधव यांनी करून दाखवली या एक दिवसीय शिबिराचे उद्घाटन इंटरनॅशनल योगा ट्रेनर.डॉ. सौ अलका जाधव,योगशिक्षिका सौ. सुरेखा फाळके, श्री. विलास जाधव. पतंजली योग समितीचे अध्यक्ष मा श्री दत्तात्रय अनपट उपाध्यक्ष श्री शहाजी बोराटे त्याचबरोबर महिला पतंजली योग समितीच्या अध्यक्षा मा सौ मायाताई विंचू, तसेच सौ.शोभाताई भरणे,सौ उमाताई इंगोले. महीला पतंजली योग सामिती उपाध्यक्ष मा सौ राजश्रीताई शिंदे, कार्याध्यक्ष सौ कल्पना भोर, मार्गदर्शिका सौ निर्मलाताई कवितके सौ. अमिताताई पाडूळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी बहुसंख्येने इंदापूर तालुक्यातून पुरुष व महिला साधक उपस्थित होते तसेच कालठण न.१ मधील दोन्ही वर्गातील योग साधक व योग शिक्षक श्री. मांढरे काका उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.सौ अलका जाधव यांनी ६५ व्या वर्षी अवघड अवघड आसनांची प्रात्यक्षिके करून दाखवली त्यांनी केलेली आसने पाहून उपस्थित साधक आनंदी झाले तसेच वयाच्या ४५ व्या वर्षी योग प्राणायाम यांस सुरुवात केला व तिथून पुढे त्यांना याची गोडी निर्माण झाली त्यातूनच आपण काहीतरी महिलांना प्रेरणा द्यावी या हेतूने अवघड अवघड आसनांचा सराव चालू केला संपूर्ण आरोग्य निरोगी व चैतन्यमय झाले आज पर्यंत त्यांना दोनशेहून जास्त सुवर्ण पदक मिळालेली असून भारतातील महत्त्वपूर्ण असा भारत योगरत्न पुरस्कार, तसेच रशिया,थालंड, साऊथ कोरिया या देशांचे सवर्ण पदक त्यांना मिळालेली आहेत.

याप्रसंगी डॉ.सौ.अलका जाधव यांनी सध्याचे वाढत चाललेले दुर्धर असे महिलांचे आजार याबाबत माहिती दिली तसेच या वयात सुद्धा स्वतः ज्याप्रमाणे शरीराची लवचिकता ठेवलेली आहे याचे गमक सर्वांना सांगितले खरोखरच आजच्या कार्यक्रमामुळे उपस्थितांना प्रेरणा मिळाली कंबरदुखी गुडघेदुखी मणक्याचे विकार यावरती आसनांच्या माध्यमातून कशाप्रकारे मात करावयाची याबाबतची प्रात्यक्षिके करून दाखवली तसेच आहार दिनचर्या याबाबतच्या पण महत्त्वपूर्ण अशा टिप्स त्यांनी उपस्थितांना दिल्या. पतंजली परिवारातील सर्व पुरुष व महिला साधकांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अतिशय छान पद्धतीने झाला. यावेळी त्यांना पतंजली परिवाराच्यावतीने जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच उपस्थित पत्रकार बांधव



यांचा पण यथोच्छीत असा सन्मान करण्यात आला.

दादासाहेब पाटील विद्यालयाची विद्यार्थिनी कु. साक्षी सतिश चोपडे हीने रीदमीक योगा वरती आसणे करून दाखविली तिचा सन्मान डॉ. अलकाताईंच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचा योग घडवून आणला असे पतंजली योग परीवाराचे मार्गदर्शक श्री. वसंत जाधव सर व सेवानिवृत अधिकारी उच्च उर्जा पदार्थ संशोधन लॅबोरेटरी पाषाण पुणे संरक्षण संशोधन संस्था. ब्रह्मोस, अग्नी, आकाश, मिसाईल विकास करण्यासाठी सहभाग असे श्री. सत्यवान जगताप.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक योग परिवाराचे अध्यक्ष श्री दत्तात्रय अनपट यांनी केले त्याचबरोबर हा कार्यक्रम व्यवस्थित पारपाडण्यासाठी चोख व्यवस्थेचे नियोजन करणारे, श्री. जितेंद्र माने व त्यांना साथ देणारे सर्व साधक टीम, तसेच सूत्रसंचालन सौ. सुनिता गलांडे यांनी केले व सर्वांचे आभार सौ. मायाताई विंचू यांनी मानले.